I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

# प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर **P.S. (पोलीस ठाणे):** फौजदार चावडी **Year (वर्ष):** 2026

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0548 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 30/06/2026 22:44 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** मंगळवार **Date from (दिनांक पासून):** 30/06/2026 **Date To (दिनांक पर्यंत):** 30/06/2026

**Time Period (कालावधी):** प्रहर ५ **Time From (वेळेपासून):** 12:40 तास **Time To (वेळेपर्यंत):** 14:44 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 30/06/2026 **Time (वेळ):** 22:00 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 036 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 30/06/2026 22:44 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** उत्तर, 2 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** निराळे वस्ती , सैराट बिर्याणी या दुकानासमोर, , सोलापूर,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

District (State) (जिल्हा (राज्य)):

6. **Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** प्रशांत रामचंद्र चौगुले

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1983

(d) **Nationality (राष्‍ ट्रीयत्‍ व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):**

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर, फौजदार चावडी, सोलापुर शहर, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर, फौजदार चावडी, सोलापुर शहर, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9823225465

7. **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| S. No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address(वर्तमान (पत्ता)) |
|---|---|---|---|---|
| 1 | पकंज जगन्नाथ महाले | | | 1. भरत जाधव यांचे घरी भाडयाने,निराळे वस्ती,Town/Village (शहर / गाव): सोलापूर,Tehsil (तहसील): Police Station (पोलीस ठाणे): फौजदार चावडी,District (जिल्हा): सोलापुर शहर,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S. No. (अ.क्र.) | Propertty Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (विवरण) | Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | स्विकारलेली लाचेची रक्कम | 4,000.00 |

10. **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 4,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद दि. 30/06/2026

मी प्रशांत रामचंद्र चौगुले, वय - 43 वर्षे, व्यवसाय नोकरी, पद-पोलीस उपअधिक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर मो. नं. 9823225465 समक्ष फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर युनिट येथे माहे मे- 2025 पासून पोलीस उपअधिक्षक या पदावर कार्यरत आहे.

दि.30/06/2026 रोजी आम्ही कार्यालयात असताना सकाळी 10.00 वा. सुमारास तक्रारदार श्री. गणेश बाळकृष्ण धडे, वय - 37 वर्षे, व्यवसाय - टु व्हीलर खरेदी विक्री, राह. 145,सिध्देश्वर पेठ, मनपा क्वार्टर्स, पानगल हायस्कुल शेजारी,सोलापुर, जि. सोलापुर, हे समक्ष कार्यालयात आले व आमची भेट घेतली. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचे वडील आरोग्य अभियंता विभाग अंतर्गत देगांव, तालुका उत्तर सोलापूर येथे कायम मजुर बिगारी म्हणुन नोकरीस होते. ते दि. 31/05/2026 रोजी सोलापुर महानगरपालिकेमधुन सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांना पेन्शन, फंड व इतर त्यांच्या देय रकमा मंजुर करुन देण्याकरीता लाच मागणी होत असलेबाबत सांगितले. त्यामुळे तक्रारदार धडे यांचे तक्रारीचे अनुषंगाने लाच मागणीची पडताळणी करून पुढील कारवाई करणे करीता आम्ही दि. 30/06/2026 रोजी आमचेकडील अंमलदार यांचे मार्फत तालुका कृषि अधिकारी उत्तर सोलापूर यांचे कार्यालयास पंच उपलब्ध करुन देणेबाबत पत्र देवून दोन शासकिय पंच उपलब्ध करून घेतले. सुमारे 11.30 वा चे सुमारास 1. श्री. प्रमोद जयपाल पाटील वय 39 वर्षे, पद- सहाय्यक कृषि अधिकारी ,सोरेगांव 2. श्री. शकुल दत्तात्रय शेळके वय 38 वर्षे, पद- सहाय्यक कृषि अधिकारी ,बी.बी.दारफळ हे दोन्ही पंच साक्षीदार ला.प्र.वि सोलापूर या कार्यालयात आमच्या समक्ष हजर झाले. त्यावेळी मी दोघा पंचांना माझी ओळख सांगुन तक्रारदार श्री. गणेश बाळकृष्ण धडे, रा. 145,सिध्देश्वर पेठ, मनपा क्वार्टर्स, पानगल हायस्कुल शेजारी,सोलापुर यांची ओळख करून देऊन दोन्ही पंचांचे समक्ष त्यांचे तक्रारीबाबत थोडक्यात हकीकत विचारली असता " त्यांनी त्यांचे नाव श्री. गणेश बाळकृष्ण धडे, रा. 145,सिध्देश्वर पेठ, मनपा क्वार्टर्स, पानगल हायस्कुल शेजारी,सोलापुर असे असल्याचे सांगून, त्यांचे वडील नामे श्री. बाळकृष्ण मल्हारी धडे, वय 60 वर्षे, हे सोलापुर महानगरपालिकेमध्ये सार्वजनिक आरोग्य अभियंता विभाग अंतर्गत देगांव, तालुका उत्तर सोलापूर येथे कायम मजुर बिगारी म्हणुन नोकरीस होते. ते दि. 31/05/2026 रोजी सोलापुर महानगरपालिकेमधुन सेवानिवृत्त झाले आहेत. माझे वडीलांना अर्धांगवायु झाला असल्याने ते सेवानिवृत्त झाले नंतर दि. 09/06/2026 रोजी त्यांना पेन्शन, फंड व इतर त्यांच्या देय रकमा मिळणे करीता सार्वजनिक आरोग्य अभियंता, सोलापुर महानगरपालीका येथे माझ्या वडीलांचे वतीने मी अर्ज दिला होता. अर्ज देते वेळी तेथे काम करणारे क्लार्क महाले यांनी माझा अर्ज घेवुन मला सांगितले की, तुमच्या वडीलांचे पेन्शन, फंड व इतर मिळणा-या रकमा मंजुर करुन घ्यायचे काम माझ्याकडेच आहे ते बिल काढुन दयायचे असल्यास मला 10 हजार रुपये दया मी तुमचे काम करून देतो जर तुम्ही मला पैसे दिले नाहीत तर तुमचे काम होणार नाही. त्यावर त्यांना मी गरीब आहे माझ्याकडे ऐवढे पैसे नाहीत सध्या 5 हजार रुपये आहेत असे म्हणालो असता त्यांनी माझेकडुन त्यावेळी 5 हजार रुपये घेतले व उरलेले 5 हजार लवकर दया मी तुमचे काम साहेबांकडुन करुन घेतो असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना ठिक आहे असे म्हणुन त्यांचे ऑफिसमधुन निघुन आलो. दि. 26/06/2026 रोजी मी माझे वडीलांचे पेन्शन, फंड व इतर त्यांच्या देय रकमा मिळणे करीता केलेल्या अर्जाचे काय झाले हे पाहण्याकरीता सार्वजनिक आरोग्य अभियंता, सोलापुर महानगरपालीका येथे जावुन क्लार्क महाले यांना भेटलो असता त्यांनी माझ्याकडे पुन्हा 5 हजार रुपयांची मागणी केली त्यावेळी माझ्याकडे 5 हजार रुपये नसल्याने मी

त्यांना 1 हजार रुपये दिले त्यांवेळी त्यांनी मला ठरलेले 4 हजार रुपये लवकर दे असे म्हणाले असता मी नाईलाजास्तव त्यांना दि. 30/06/2026 रोजी येवुन ठरलेले 4 हजार रुपये देतो असे सांगितले आहे. सोलापुर महानगरपालिकेमधील क्लार्क महाले यांनी माझ्याकडे मागणी केलेले 10 हजार रुपये हे कोणतीही शासकिय फि नसुन ती लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाली असुन त्यांना मी यापुर्वी 6 हजार रुपये दिले असुन ठरलेले 4 हजार रुपये मला त्यांना देण्याची इच्छा नाही.

तरी सोलापुर महानगरपालिकेतील क्लार्क महाले याचेवर कायदेशीर कारवाई करावी माझ्यात व क्लार्क महाले यांचे मध्ये माझे वडीलांचं पेन्शन व फंडाचे कामा व्यतिरीक्त कोणताही पैशाचा देवाण घेवाणचा व्यवहार नाही. तसेच भांडण तंटा नाही. " अशा आशयाची तक्रार सांगुन त्यांची सविस्तर तक्रार स्व:हस्ताक्षरामध्ये लिहुन दिली. त्यानंतर सदरची तक्रार आम्ही व दोन्ही शासकीय पंचांनी वाचून त्यावर सहया केल्या. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी व पुढील कारवाई करणेकामी पंच म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता, दोन्ही पंच साक्षीदार यांनी पंच म्हणून काम करण्यास त्यांची संमती दिली. त्यानंतर तक्रारदार गणेश बाळकृष्ण धडे यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी पंच क्र.1 म्हणून श्री. प्रमोद जयपाल पाटील व पंच क्र. 2 म्हणून श्री. शकुल दत्तात्रय शेळके यांनी काम पाहण्याचे ठरले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार धडे, दोन्ही पंच साक्षीदार यांना आमचेकडील सोनी कंपनीचे IC RECORDER ICD-UX570F 5V SONY CORP. MADE IN CHINA 1080938 व्हॉईस रेकॉर्डर व EVM या कंपनीचे 8 GB चे मेमरी कार्ड त्याच्या समोरील बाजुस EVM 8 GB micro SD 10 I 1 HC त्याचे पाठीमागील बाजुस CE MM8GC10FSXB6D-243 240816 SM MADE IN TAIWAN EVMTF/ 8GB0824 SE असे वर्णनाचे नवीन मेमरीकार्ड दाखवुन त्यांचा वापर व उपयोग समजावून सांगितला. त्यानंतर सदरचे मेमरीकार्ड व्हॉईस रेकॉर्डरमध्ये टाकले व त्यानंतर आणखीन एक HIKVISION कंपनीचे 04 जीबीचे मेमरीकार्ड सदर मेमरीकार्डवर micro SD V 10 HC 1 4GB HIKVISION त्याचे पाठीमागील बाजुस ACX01S0016SZHS2539004G असे वर्णनाचे मेमरीकार्ड त्याचे पाकीटातून काढून ते मेमरीकार्ड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडील शासकिय मोबाईल सॅमसंग गॅलक्सी ए-06 कंपनीचे मोबाईलमध्ये टाकून मोबाईलचे स्टोरेज पाथ एस.डी कार्ड सिलेक्ट करण्यात आले जेणेकरून निवेदनाचे व प्राथमिक तपासणीचे व्हिडीओ चित्रीकरण करताना चित्रीकरणाचे फाईल मेमरीकार्डमध्ये जतन होईल. त्यानंतर तक्रारदार धडे व दोन्ही पंचांचे पडताळणीपुर्व निवेदन 12.34 वा चे सुमारास व्हॉईसरेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करून घेण्यात आले. तक्रारदार आणि पंचांची निवेदने घेताना त्याचे व्हिडीओ चित्रीकरण वर नमुद मोबाईलच्या माध्यमातून पोहवा/घुगे यांनी केले. त्यांनतर आम्ही, तक्रारदार व पंच क्र.1 पाटील यांना पडताळणीकामी योग्य त्या सुचना देऊन 12.40 वा चे सुमारास व्हॉईसरेकॉर्डर चालु करून, होल्ड मोडवर ठेवून तक्रारदार यांचे शर्टाच्या आतील बनियनमध्ये घालून त्यांचे गळ्यामध्ये अडकवला, त्यानंतर क्लार्क महाले यांची भेट घेण्याकरीता रवाना केले. त्यानंतर तक्रारदार धडे व पंच नं. 01 पाटील हे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर कार्यालयात 13.06 वा चे सुमारास परत आले. त्यावेळी व्हाईस रेकॉर्डर बंद करुन त्यामधील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण दोन्ही पंचासमक्ष ऐकले तसेच तक्रारदार धडे व

पंच क्र 1 पाटील यांचेकडे पडताळणीची हकिकत विचारुन खात्री केली असता तक्रारदार हे क्लार्क महाले यांची भेट घेण्याकरीता सोलापुर महानगरपालीका येथील त्यांचे ऑफिसमध्ये गेले त्यावेळी क्लार्क महाले हे ऑफिसमध्ये नसल्याने तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल क्र. 9881213693 वरुन क्लार्क महाले यांचे मोबाईल क्र. 9270327025 यावर फोन लावला त्यावेळी क्लार्क महाले यांनी ते ऑफिसमध्ये नसुन पार्क चौकामध्ये येण्यास सांगितले असल्याने तक्रारदार धडे व पंच क्र. 1 पाटील हे पार्क चौक येथे जावुन क्लार्क महाले यांची भेट घेतली असता तक्रारदार यांनी महाले साहेब आपल काय-काय केलाव असे म्हणाले त्यावर क्लार्क मी काय बोलतो ऐका तुमच करुन देतो फक्त कुणाला काय बोलु नका..असे म्हणाले त्यावर तक्रारदार नाही असे म्हणाले त्यावर क्लार्क महाले माझ्या पध्दतीने मी बरोबर करतो, तुमाला काही त्रास होणार नाही...असे म्हणाले तक्रारदार हा.. असे म्हणाले त्यावर क्लार्क महाले आता सकाळी मी बील चेक करायला गेलेलो, आता तुमाला सांगतो, आहे का अकाऊंटंट, अकाऊंटंट ऑफिस.. आता तुझ सकाळी ओके करुन पुढ पाठवून दिल असतं. तुमच सेवापुस्तकाला एक तर प्रॉब्लेम आहे..ते सहाव्या वेतनची नोंद केलेलीय..ते आपल्याला सातव्या वेतन करुन घ्यायचीय.. त्याच्यामध्ये खुप फरक पडणाराय आणि फायदा तुम्हालाच होणाराय...असे म्हणाले त्यावर तक्रारदार पेन्शन वाढवून येणाराय..असे म्हणाले त्यावर क्लार्क महाले हां..पेन्शन वाढवून येणाराय..चार-पाच हजाराचा फरक पडणाराय किती फरक पडतय सांगा बर तुमी..मला.असे म्हणाले त्यावर तक्रारदार भरपूर होतय की साहेब..असे म्हणाले त्यावर क्लार्क महाले आपल्याला ना तेंना पेमेंट द्यायचय बस..असे म्हणाले त्यावर तक्रारदार होका साहेब..आता ठरल्याप्रमाणे आता मी 6000 एकदा दिलो. 5000 दिलो.असे म्हणाले त्यावर क्लार्क महाले पाच दिलेत..असे म्हणाले त्यावर तक्रारदार पहिला अर्ज ज्या वेळेस दिला 20 तारखेला..ही एक हजार 6000 हजार पोहचले. आता काल आपल फोनवर झाल मी भावापशी 4000 हजार खर्च होतील म्हणुन ठेवलो. कारण घरात राशन संपलय साहेब..मग ती भावापशी ठेवलय हिप्परग्यात हाय..असे म्हणाले त्यावर क्लार्क महाले ओके असे म्हणाले त्यावर तक्रारदार जावुन लगेच घेवून येतो..तुमी काम थांबवू नका तुमी करा अर्ध्या ते पाऊन तासात आणुन पैसे पोहच करतो.असे म्हणाले त्यावर क्लार्क महाले सगळ मी रेडी केलेल आहे..मला फक्त तेंना पेमेंटसाठी थांबलेलं आहे. बाकी काहीच नाही त्यावर तक्रारदार काल साहेब..मी अँक्च्युली मी आणलो होतो पाच हजार रुपये..असे म्हणाले त्यावर क्लार्क महाले तुमी मला 11 वा. बोलले ना मी सकाळी आलो ड्युटी कॅन्सल केली. परत तेंच्याकडे गेलो..त्यांनी सगळ बघीतल..मग ते पेमेंट..असे म्हणाले त्यावर तक्रारदार आता होका साहेब तुमाला हे चार देतो. ते पहिल्याचे पाच अन हि एक सहा. दहा होतेत..ते पंधरामध्ये कायतर कम करा हात जोडतो..असे म्हणाले त्यावर क्लार्क महाले मी तुमाला, तुमाला काय प्रॉब्लेम येवू देत नाही ओ..तुमाला सगळ ओके करुन देतो..तुमी काही काळजी करु नका.. फक्त मला कस काय मला लागलीच..तुमाला काय येतनाय प्रॉब्लेम..पण..मला काय असे म्हणाले त्यावर तक्रारदार हा..तुमाला मी जी शब्द दिलाय ती दहा हजार, माझ दहा हजार मध्ये करा..बाकी..असे म्हणाले त्यावर क्लार्क महाले बील चेक करायला तीथ पैसे लागतातच..असे म्हणाले तक्रारदार नाही देतो की साहेब, अर्धा तासात अर्धा पाऊन तासात मी हिप्परग्यातुन आणुन तुमाला देतो तुमाला पोहच करतो चार देतो बघा..चार हजारच फक्त..असे म्हणाले त्यावर क्लार्क महाले मी हिथ..हितच कुठ आहे..निराळे वस्तीमध्ये आहे.. हं..तीथ मला फोन कर आलं की..असे म्हणाले त्यावर तक्रारदार चारच हजार देतो

आं..साहेब असे म्हणाले त्यावर क्लार्क महाले चालतय घेतो करुन तुझ..असे म्हणाले त्यावर तक्रारदार म्हणजे दहा हजार पोहचतेत तुम्हाला..असे म्हणाले त्यावर क्लार्क माझ्याकडून जेवढे हाय तेवढे बोललोय तुम्हाला मी..फक्त तुमाला व्यवस्थित सगळ करुन देतो..असे म्हणाले त्यावर तक्रारदार चालतय असे म्हणाले त्यावर क्लार्क महाले पण आजच..आजच..केल नाही ना मग लय अवघड होणाराय..असे म्हणाले त्यावर तक्रारदार आज आत्ता तुमाला चार हजार आणुन देतो म्हणजे देतो. असे म्हणाले त्यावर क्लार्क अर्धा एक तासात या..असे म्हणाले असल्याचे निष्पन्न झाले. सदर पडताळणी कारवाई दरम्यान क्लार्क महाले यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांचे वडिलांचे सेवानिवृत्तीनंतरचे पेन्शन, फंड व इतर मिळणा-या रकमा मंजुर करुन देण्याकरीता यापुर्वी घेतलेले 6 हजार रुपये स्विकारल्याचे मान्य करुन व उर्वरित 4,000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. सदरची लाच रक्कम

क्लार्क महाले यांनी तक्रारदार धडे यांना निराळे वस्ती सोलापुर येथे घेवुन येणे बाबत सांगितले असल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,सोलापूर कार्यालयात तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांचे क्रमांक लिहून घेणे, तक्रारदार व दोन्ही पंचांना अँन्थ्रासीन पावडरची माहिती देऊन त्याचे प्रात्यक्षिक करणे व हजर केलेल्या नोटांना पावडर लावणे इ. सापळापुर्व कारवाई केली त्या दरम्यान तक्रारदार यांचे मोबाईल क्र. 9881213693 वर क्लार्क महाले यांचे मोबाईल क्र. 9270327025 यावरुन फोन आला त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेसमोर व्हॉईस रेकॉर्डर सुरु करुन त्यांचे मोबाईल फोनवरील बोलणे रेकॉर्ड करून घेतले त्यावेळी क्लार्क महाले यांनी तक्रारदार यांना भेटीचे ठिकाण निराळे वस्ती सैराट बिर्याणी या दुकानासमोर येण्यासाठी सांगितले. त्यामुळे लागलीच तक्रारदार व दोन्ही पंचांचे सापळा कारवाईच्या अनुषंगाने वर नमुद मेमरीकार्डमध्ये 14.20 वा सुमारास व्हॉईसरेकॉर्डरव्दारे निवेदन रेकॉर्ड करून घेतले. सदरचे निवेदन रेकॉर्ड करून घेताना पोहवा/घुगे यांनी ला.प्र.विभागकडील मोबाईलमधून वर नमुद मेमरीकार्डमध्ये व्हिडीओ चित्रीकरण केले. त्यानंतर आम्ही सापळा कारवाईच्या अनुषंगाने तक्रारदार, दोन्ही पंच व सापळा पथकातील अंमलदारांना आवश्यक त्या सुचना देण्यात आल्या. त्यानंतर तक्रारदार धडे व पंच क्र.1 पाटील यांना क्लार्क महाले यांची भेट घेण्यासाठी 14.31 वा.चे सुमारास व्हॉईसरेकॉर्डर चालु करून, होल्ड मोडवर ठेवून तक्रारदार यांचे शर्टाच्या आतील बनियनमध्ये घालून त्यांचे गळ्यामध्ये अडकवला निराळे वस्ती सोलापूर येथे तक्रारदार यांचे अँक्टीव्हा स्कुटी नं. MH13DA 8148 यावरुन रवाना केले. त्यांचे पाठोपाठ आम्ही स्वतः पंच क्र.2, पोहेकॉ/71 सोनवणे,571/मुल्ला, पोशि/862 पवार असे व चालक पोकॉ/2026 श्रीराम असे निराळे वस्ती,सोलापूर येथे रवाना झालो.

सापळा कारवाईदरम्यान तक्रारदार धडे व पंच क्र.1 पाटील हे दोघे निराळे वस्ती,सोलापूर येथील सैराट बिर्याणी दुकानासमोर रस्त्याचे कडेला जाऊन थांबले. त्यावेळी क्लार्क महाले हे समोरच रस्त्यावर उभे होते. त्यावेळी तक्रारदार यांनी क्लार्क महाले यांना हाक मारुन इशारा करुन आपले जवळ बोलावून घेतले त्यावर क्लार्क महाले चाललो होतो... महानगर पालिकेला वाट बघून तुझी ...असे म्हणाले त्यावर तक्रारदार धडे मला जरा उशिर झाला साहेब ते भाऊ आमचा बाहेर गेला होता. त्यामुळं मला जरा उशीर झाला. माझे वडिलांचे फंडाचे,पेंशनचे रक्कमेचे काम कधी होतय असे विचारुन त्याबाबत क्लार्क महाले यांचेशी बोलुन वडीलाला पॅरेलेलीस झाल्यावर झाल बघा साहेब मला

महित साहेब हि पैसे कस कस अँडजेस्ट केलो.. माझ मला माहित असे तक्रारदार म्हणाले त्यावर क्लार्क महाले मी तुम्हाला मागेच बोलो कुणाला काय बोलु नका रिलॅक्स रहावा म्हटलं..कसं माहिती आहे तुम्ही पुर्ण पेंमेन्ट दिली ना तुमची कुठची काम थांब नाही... अर्धे दिले ना मग प्रत्येक ठिकाणी पैसे लागते मग एकाशी सही झाल की दुस-या  पैसे लागते मग ती फाईल थांबते.. एक एक दिवस पुढं..पुढ ढकलत जाते अजून ते अर्जित रजेच आहे तुमचं असे म्हणाले  त्यावर तक्रारदार बापर हे साहेब आता.. आणलो बघा हे चार हजार हायतं.. ठरल्याप्रमाणे आपलं दहा हजार रुपये झाले असे म्हणाले त्यावर क्लार्क महाले आता दहा हजार झाले...हां.. आता तुम्हाला.असे म्हणाले त्यावेळी तक्रारदार यांनी त्यांचा डावा हात डोक्यावरून फिरवून लाच स्वीकारल्याचा इशारा दिला. त्यावेळी त्या परिसरात सापळा लावून थांबलेले आम्ही सर्वजण क्लार्क महाले यांना 14.44 वा चे सुमारास रंगेहात ताब्यात घेतले. क्लार्क महाले यांना ताब्यात घेण्यात आल्यावर सदरठिकाणी त्यांचे अंगातील शर्टाचे डावे बाजुचे खिशात ठेवलेली लाच रक्कम पंच क्र.2 शेळके यांनी ताब्यात घेतली, त्यानंतर पंच क्र.2 शेळके यांनी सदर नोटांच्या क्रमांकाची तपासणी केली असता ते तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांशी तंतोतंत जुळून आले. त्यावेळी प्राथमिक तपासणीचेे व्हिडीओ चित्रीकरण पोहवा/मुल्ला यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडील मोबाईलमध्ये केले.

त्यानंतर सदरचे ठिकाण हे रस्त्यावरील रहदारीचे असल्याने क्लार्क महाले यांना ताब्यात घेवून सापळा पथकासह आम्ही शासकिय वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,सोलापूर कार्यालयात आलो. त्यावेळी कार्यालयामध्ये क्लार्क महाले यांची यांची प्राथमिक तपासणी करतेवळी क्लार्क महाले यांच्या दोन्ही हाताची, शर्टाचे खिशाची व त्यांच्या ताब्यातून मिळालेल्या नोटांची अल्ट्रा व्हायोलेट दिव्याच्या प्रकाशात तपासणी करता त्यावर अँन्थ्रासीन पावडरची निळसर चकाकी दिसून आली. क्लार्क महाले प्राथमिक तपासणीचे व्हिडीओ चित्रीकरण पोहवा/घुगे यांनी ला.प्र.विभागाकडील मोबाईलमध्ये केले. त्यानंतर तक्रारदार धडे व क्लार्क महाले यांचेमध्ये पडताळणी व सापळयावेळी झालेल्या संभाषणाचा उतारा काढून सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा करण्यात आला.

तरी दि.30/06/2026 रोजी तक्रारदार गणेश बाळकृष्ण धडे, वय - 37 वर्षे, व्यवसाय - टु व्हीलर खरेदी विक्री, राह. 145, सिध्देश्वर पेठ, मनपा क्वार्टर्स, पानगल हायस्कुल शेजारी, सोलापुर, जि. सोलापुर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दि.30.06.2026 रोजी 12.40 वा. पासून ते 13.06 वा. चे दरम्यान करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईमध्ये क्लार्क महाले यांनी तक्रारदार यांचे वडिलांचे सेवानिवृत्तीनंतरचे पेन्शन, फंड व इतर मिळणा-या रकमा मंजुर करून देण्याकरीता 10000/-रुपये ठरलेपैकी यापुर्वी 6000/- रू स्वीकारल्याचे मान्य करून 4000/- रू लाचेची मागणी केली.  त्यानंतर 14.31 वा. पासून ते 14.44वा. चे दरम्यान करण्यात आलेल्या सापळा कारवाईदरम्यान क्लार्क महाले यांनी तक्रारदार यांच्याकडून 10000/-रुपये ठरले पैकी यापुर्वी 6000/- रू स्वीकारल्याचे मान्य करून 4000/- रू रक्कम स्वत: करीता स्वीकारुन कायदेशिर परिश्रमाखेरीज अवैध पारितोषण स्विकारून गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले म्हणून पकंज जगन्नाथ महाले वय.32 वर्षे, व्यवसाय-नोकरी पद-कनिष्ठ श्रेणी लिपीक,नेम-सार्वजनिक आरोग्य अभियंता,सोलापूर महानगरपालिक सोलापूर हल्ली राहणार भरत जाधव यांचे घरी भाडयाने ,निराळे वस्ती,सोलापूर मुळ राहणार-उंबरपाडा,देहरे ता.जवाहर जि.पालघर यांचेविरूध्द मी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे सरकारतर्फे

कायदेशीर फिर्याद देत आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणेप्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे. हा फिर्यादी जबाब दिला.

समक्ष –

ठाणे अंमलदार

मपोसई/ जेऊघाले सो

फौजदार चावडी सोलापुर शहर.

तपास- पोनि योगेश चव्हाण नेम लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सांगली, सध्या कॅम्प सोलापुर पो. ठाणे अंमलदार- मपोसई/ जेऊघाले सो

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Mahadev Pandurang Raut (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

**Registered by (नोंदणी अधिकारी)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Mahadev Pandurang Raut

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** PI

**14. Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल या/पाहिलेल या) शारीरिक वैशिष टये, व यंग आणि इतर तपशील**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्‍ मतारीख / वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1994 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व यंग / वैशिष टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल याच या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त यापेक्षा अधिक तपशील दिल यास फक त यातील रकान यांची नोंद घेतली जाईल)**